मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पुणे-लोणावळा लोहमार्गासाठी महायुती सरकारकडून निधी

## लोणावळा, खंडाळा, माथेरान पर्यटन स्थळ विकासासाठी 250 कोटी रुपये मंजूर : खासदार बारणेंची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील महायुती सरकारने 2,500 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्यामुळे पुणे लोणावळा लोहमार्गाच्या चौपदरीकरणाचा विषय मार्गी लागला आहे, अशी माहिती मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी-आरपीआय-रासप मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी आज दिली.

खासदार बारणे यांच्या प्रचारासाठी लोणावळा येथे महायुतीच्या घटक पक्षांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यात ते बोलत होते. बैठकीस लोणावळ्याच्या माजी नगराध्यक्ष सुरेखा जाधव, माझी उपनगराध्यक्ष श्रीधर पुजारी, रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे, भाजपचे शहराध्यक्ष अरुण लाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष विलास बडेकर, शिवसेनेचे तालुकाप्रमुख राजू खांडभोर, लोणावळा शहर प्रमुख संजय भोईर, युवा सेना प्रमुख विवेक भांगरे, महिला आघाडी प्रमुख मनीषा भांगरे, मुस्लिम बँकेचे संचालक जाकीर खलिफा, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र तरस, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख शरद हुलावळे, आरपीआय आठवले गटाचे शहराध्यक्ष कमलसिंग म्हस्के, माजी नगरसेवक देविदास कडू, तसेच सुनील हागवणे, राम सावंत दत्ता चोरगे, विशाल हुलावळे, सुधाताई सोमण आदी पदाधिकारी उपस्थित होते.

खासदार बारणे यांनी लोणावळा परिसर व मावळ तालुक्यात केलेल्या विविध विकास कामांची माहिती यावेळी दिली. पुणे-लोणावळा लोहमार्गाच्या चौपदरीकरणाचे काम मागील सरकारच्या नाकर्तेपणामुळे रखडले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने अडीच हजार कोटी रुपयांचा राज्याचा वाटा मंजूर करून तो विषय मार्गी लावला. लोणावळा कर्जत मार्गाचे कामही होत आहे. लोणावळ्यासह रेल्वे स्थानकांचा विकास देखील झपाट्याने सुरू आहे, अशी माहिती त्यांनी दिली.



कार्ला येथील एकविरा देवस्थानला तीर्थविकास प्राधिकरणाचा दर्जा देण्यात आला आहे. लोणावळा, खंडाळा, माथेरान पर्यटन स्थळ विकासासाठी 250 कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. मावळ्यातील 100 पेक्षा जास्त गावात खासदार म्हणून आपण विकास निधी दिला आहे. शहरी भागात देखील विकास निधी कमी पडू दिलेला नाही. केवळ दलित वस्त्यांना साडेसात कोटी रुपये निधी दिला आहे. इंद्रायणी सुधार योजनेसह विविध कामे मार्गी लावली आहेत, असे त्यांनी सांगितले. विरोधकांनी कोणताही विकास केलेला नसल्यामुळे त्यांना विकासावर बोलता येत नाही. त्यामुळे केवळ टीकेसाठी टीका करतात, असा आरोप बारणे यांनी केला.

लोणावळ्याचे ग्रामदैवत भैरवनाथ देवस्थान येथे जाऊन खासदार बारणे यांनी दर्शन घेतले. त्या ठिकाणी माजी नगराध्यक्ष अमित गवळी, विश्वस्त संतोषी शिंदे, राष्ट्रवादीचे विलास बडेकर, नवनाथ हारपुडे, सुनील हारपुडे, प्रकाश हारपुडे, भरत हारपुडे यांनी खासदार बारणे यांचा सत्कार करून त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या. अमित गवळी यांच्या निवासस्थानी तसेच नितीन कुलस्वामिनी महिला मंचच्या मोफत शिवण क्लासला देखील बारणे यांनी सदिच्छा भेट दिली. गवळीवाडा येथील प्रसिद्ध श्रीराम मंदिरास भेट देऊन खासदार बारणे यांनी दर्शन घेतले.

जुना खंडाळा भागातील श्री सोमनाथ मित्र मंडळ श्री महादेव मंदिर येथे जाऊन खासदार बारणे यांना दर्शन घेतले. मग त्यावेळी माजी नगरसेविका अंजली कडू, भाजपचे माजी शहराध्यक्ष बाळासाहेब जाधव व अन्य मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष जीवन गायकवाड यांच्या निवासस्थानी खासदार बारणे यांनी सदिच्छा भेट दिली. त्यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव टकले, भाजपचे तालुकाध्यक्ष भाऊ गुंड, भाजपा महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष सायली बोत्रे तसेच जितेंद्र बोत्रे, चंद्रशेखर भोसले चऱ्होलीकर आधी पदाधिकारी उपस्थित होते.

# मावळात 'उबाठा'ला मोठे खिंडार

## मतदारसंघात विकासाची, जनसेवेची आणि जनकल्याणाची गुढी उभारू : संजोग वाघेरे पाटील

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत मावळ तालुक्यात शिवसेना 'उबाठा'ला मोठे खिंडार पडले असून तालुक्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी खासदार श्रीरंग बारणे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला आहे. काळेवाडी येथे झालेल्या शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी-आरपीआय-रासप मित्रपक्ष महायुतीच्या मेळाव्यात हा शिवसेना पक्षप्रवेश झाला. खासदार बारणे यांनी आपल्या जुन्या सहकाऱ्यांचे पक्षात स्वागत केले.

'उबाठा' गटाचे मावळ उपतालुकाप्रमुख व माजी सरपंच चंद्रकांत भोते, ओव्हळे गावचे



विद्यमान उपसरपंच समीर कराळे, उबाठा शाखाप्रमुख विजय भोते, माजी सरपंच मनोहर भोते, गणेश भोते, ग्रामपंचायत सदस्य रवींद्र भोते, नवनाथ भोते, उबाठा परंदवडी शाखाप्रमुख विकास जगदाळे, गणेश भोते, कचरेवाडी येथील संतोष कचरे, मधुकर कचरे, रामदास कचरे आदींसह महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनीही शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, उपजिल्हाप्रमुख शरद हुलावळे, जिल्हा संघटक अंकुश देशमुख, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# पुण्यात नालेसफाईसाठी 10 मेपर्यंत मुदत

## पावसाळा पूर्व कामाअंतर्गत नालेसफाईला सुरुवात : महापालिका आयुक्तांचा आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी पावसाळा पूर्व कामाअंतर्गत नालेसफाईला सुरुवात झाली आहे. ही कामे १० मे पर्यंत पूर्ण करावीत, असे आदेश महापालिका आयुक्त, प्रशासक डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिले आहेत. मात्र, पावसाळापूर्व कामे संथ गतीने सुरू असल्याने मुदतीमध्ये नालेसफाईची कामे होणार का आणि निविदा ४५ टक्के कमी दराने आल्याने कामांच्या गुणवत्तेबाबतचा प्रश्न कायम राहणार आहे.

महापालिकेकडून दरवर्षी पावसाळा पूर्व कामाअंतर्गत शहरातील नाले, ओढे, पावसाळी गटारे, वाहिन्यांची स्वच्छता केली जाते. मात्र, ही कामे पावसाळा तोंडावर आला तरी सुरूच असतात, असे चित्र अलीकडच्या काही वर्षातील आहे. नालेसफाईची कामे उशिरा सुरू होत असल्याने आणि ती रखडल्याने वेळोवेळी या कामांना मुदतवाढ द्यावी लागल्याचे प्रकारही पुढे आले आहेत. कागदावर कामे केल्याचे दाखवून ठेकेदारांकडून पैसे लाटले जात असल्याने पावसाळ्यात अनेक भागांत पाणी तुंबण्याच्या घटना घडल्याने महापालिकेला अनेकवेळा टीकेला सामोरे जावे लागले आहे. या पार्श्वभूमीवर यावेळी लवकर नालेसफाई करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यातच लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लक्षात घेऊन निविदा प्रक्रिया लवकर राबविण्यात आली.

पावसाळा पूर्व कामे सुरू झाली असली तरी अद्यापही कामांचा वेग वाढलेला नाही. पावसाळी गटारांची स्वच्छता, नाल्यांची सफाई संथ गतीने सुरू आहे. मात्र कामांचा वेग वाढेल, असा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. ही सर्व कामे १० मे पर्यंत पूर्ण करण्याची सूचना संबंधित विभागांना करण्यात आली आहे. महापालिकेची सर्व पंधरा क्षेत्रीय कार्यालये, पाच परिमंडळ उपायुक्तांकडून या कामांवर देखरेख ठेवली जाणार आहे.




महापालिकेने १५ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील नाले आणि पावसाळी गटारे साफ करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविली होती. त्याबाबतचे पूर्वगणनपत्रकही मंजूर करण्यात आले होते. पावसाळ्यापूर्वी नाल्यांमधील कचरा, वाढलेले गवत यांसह पाण्याच्या प्रवाहात येणारे अडथळे काढण्याची कामे याअंतर्गत केली जाणार आहेत. तसेच पावसाळी वाहिन्यांची साफसफाई केली जाणार आहे. महापालिकेने निविदाप्रक्रिया राबविल्यानंतर ठेकेदारांनी १० ते ५३ टक्के इतक्या कमी दराने निविदा भरल्या होत्या. पूर्वगणन पत्रकापेक्षाही त्या कमी दराने असतानाही त्याला मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे कामांच्या दर्जाबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नाल्यांची एकूण लांबी- ६४७ किलोमीटर
कल्व्हर्टची संख्या- ७४२ कल्व्हर्ट
लहान बंधारे- १२
पावसाळी वाहिन्यांची लांबी- ३२५ किलोमीटर
चेंबरची संख्या- ५५ हजार ३००

“ नालेसफाईची कामे १० मे पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार यावेळी कामे मुदतीमध्ये पूर्ण होतील. कामांचा अहवाल देण्याची सूचनाही अधिकाऱ्यांना करण्यात आली आहे. कामे गुणवत्तापूर्ण असतील.

**- डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका.**

# रेल्वे प्रवाशांचा मतदानावर बहिष्कार!

## पुणे-दौंड उपनगरी सेवा सुरु होत नसल्याने पाऊल : रेल्वे मंडळाकडे प्रस्ताव

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-दौंड मार्गावर उपनगरी सेवा सुरू करावी, अशी मागणी रेल्वे प्रवाशांकडून सातत्याने केली जात आहे. ही मागणी पूर्ण होत नसल्याने आता रेल्वे प्रवाशांनी लोकसभा निवडणुकीतील मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे. दौंड भाग बारामती लोकसभा मतदारसंघात येत असल्याने येथील उमेदवारांची भेट घेऊन प्रवाशांनी त्यांच्यापर्यंत मागण्या पोहोचविल्या आहेत.

पुणे ते दौंड दरम्यान रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या मार्गातील अडथळे दूर होत नसल्याचे चित्र आहे. दौंड जंक्शनचा पुणे विभागात समावेश करण्यात आला असला तरी पुणे-दौंड उपनगरी सेवा सुरू करण्याचा प्रस्ताव अद्याप रेल्वे मंडळाकडे धूळखात पडून आहे. त्यातच पुणे ते दौंड दरम्यानच्या गाड्या हडपसरपर्यंत धावत असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. या मार्गावरील दैनंदिन प्रवाशांची संख्या ५० हजार आहे. त्यात विद्यार्थी, व्यापारी, भाजी विक्रेते, दूध विक्रेते यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

आता लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या मार्गावरील प्रवाशांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे. पुणे ते दौंड उपनगरी विभाग घोषित करावा, पुणे ते दौंड दरम्यान गाड्यांच्या फेऱ्या वाढवाव्यात, दौंड-हडपसर डेमूचा पुणे स्थानकापर्यंत विस्तार करावा आणि शिवाजीनगर-लोणावळा लोकल ही पूर्वीप्रमाणे पुणे स्थानकावरून सोडावी आणि बारामती-पुणे पॅसेंजर करोना संकटाच्या आधीच्या वेळापत्रकनुसार चालू करावी, अशा प्रवाशांच्या मागण्या आहेत.



“ पुणे ते दौंड उपनगरी सेवा सुरू करण्याचा प्रस्ताव सहा महिन्यांहून अधिक रेल्वे मंडळाकडे पडून आहे. त्यावर अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. खासदारही प्रवाशांच्या मागण्यांचा पाठपुरावा करीत नाहीत. त्यामुळे आम्ही मतदानावर बहिष्कार टाकणार आहोत.

**– दिलीप होळकर, रेल्वे प्रवासी ग्रुप (केडगाव)**

### रेल्वे मंडळाकडे प्रस्ताव

पुणे ते दौंड दरम्यानची उपनगरी सेवा सुरू करण्याचा प्रस्ताव मध्य रेल्वेच्या मुख्यालयाने रेल्वे मंडळाकडे पाठविला होता. या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यास या मार्गावर डिझेल मल्टिपल युनिटऐवजी (डेमू) इलेक्ट्रिक मल्टिपल युनिट (एमू) गाड्या धावणार आहेत. डेमू गाड्या या दहा डब्यांच्या असतात. त्याच वेळी एमू गाड्यांना प्रत्येकी चार डब्यांचे किमान तीन युनिट असतात. त्यामुळे या मार्गावर किमान १२ डब्यांच्या गाड्या धावू शकतील. या प्रस्तावाला अद्याप मंजुरी मिळालेली नाही, अशी माहिती रेल्वेतील सूत्रांनी दिली.

# पिंपरीकरांवर पाणीकपातीची टांगती तलवार

## पवना धरणातून 520 एमएलडी,आंद्रा धरणातून 80 एमएलडी पाणीपुरवठा

**पिंपरी | प्रतिनिधी**

सद्यःस्थितीत शहराला पवना धरणातून प्रतिदिन ५२० एमएलडी आणि आंद्रा धरणातून प्रतिदिन ८० एमएलडी पाणीपुरवठा होत आहे. तीव्र उन्हाळा कायम राहिल्यास आणि पावसाने ओढ दिल्यास पिंपरीकरांवर पाणीकपातीची टांगती तलवार असणार आहे.

पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना आणि आंद्रा धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होऊ लागला आहे. तीव्र उन्हाळा कायम राहिल्यास आणि पावसाने ओढ दिल्यास पिंपरीकरांवर पाणीकपातीची टांगती तलवार असणार आहे. तूर्तास पाणीकपातीचा विचार नसल्याचे पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

सद्यःस्थितीत शहराला पवना धरणातून प्रतिदिन ५२० एमएलडी आणि आंद्रा धरणातून प्रतिदिन ८० एमएलडी पाणीपुरवठा होत आहे. दिवसाआड पाणीपुरवठ्याच्या धोरणात नोव्हेंबर २०१९ पासून कोणताही बदल करण्यात आलेला नाही. आंद्रा आणि भामा-आसखेड धरणातून वाढीव पाणी उपलब्ध झाल्यास दररोज पाणीपुरवठ्याचा निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, सध्याचा तीव्र उन्हाळा लक्षात घेता दररोज पाणीपुरवठ्यासाठी शहरवासियांना अजूनही प्रतीक्षाच करावी लागणार आहे.

**आजचा पाणीसाठा**

पवना ४१.८४ टक्के ५२० एमएलडी,आंद्रा ५०.९६ टक्के ८० एमएलडी.

पिंपरी-चिंचवड शहराला पवना आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. पाणीपुरवठ्याच्या तक्रारी वाढल्याने समान पाणीपुरवठ्याचे कारण देत महापालिका प्रशासनाने एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला. काही दिवसांसाठी सुरू केलेला असा पाणीपुरवठा साडे चार वर्षे झाले, तरी कायम आहे उन्हाची तीव्रता वाढत असताना, पाण्याची समस्या उग्र रुप धारण करु लागली आहे. तीनपैकी दोन धरणांमधील पाणीसाठा निम्म्यापेक्षा अधिक आहे. मात्र ही सर्व जलाशये लघु प्रकल्पांतर्गत येत असल्याने, नागरिकांना पुढील दोन ते अडीच महिने पाणी जपून वापरावे लागणार आहे.

साडेसहा टीएमसी पाणी पुनर्वापरासाठी उपलब्ध करून देण्याचा मुंढवा येथील प्रकल्प पूर्ण होण्यास ऑगस्ट महिना उजाडेल, असे महापालिकेचे म्हणणे आहे; त्यामुळे पुण्यावर आगामी काळात पाणीकपातीची टांगती तलवार अजूनही कायम आहे.



### दररोज ६२० एमएलडी पाणीउचल...

आजमितीला पालिका दोन्ही धरणांतून ६०० एमएलडी आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून २० एमएलडी असे एकूण ६२० एमएलडी पाणी उचलत आहे. उन्हाळ्यामध्ये पाण्याची मागणी जास्त असते; तसेच बाष्पीभवनामुळे धरणातील पाणीसाठाही झपाट्याने कमी होऊ लागला आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्यामध्ये नियोजन करणे तुलनेने आव्हानात्मक आहे. पाणीपुरवठा विस्कळीत झालेल्या भागामध्ये टँकरने पाणीपुरवठ्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. आवश्यकतेनुसार खासगी टँकरचालकांची मदत घेतली जात आहे, असे स्पष्ट करण्यात आले.

> सद्यःस्थितीत गतवर्षीइतकाच पाणीपुरवठा धरणांमध्ये शिल्लक आहे. त्यामुळे तूर्तास पाणीकपातीचा विचार नाही. मात्र, उन्हाळा तीव्र राहिल्यास आणि पावसाने ओढ दिल्यास धोरणाचा फेरविचार करावा लागेल. पाणीपुरवठा विस्कळित झालेल्या ठिकाणी आवश्यकतेनुसार पालिकेच्या किंवा खासगी टँकरने पाणी पुरविले जाते.
>
> **- श्रीकांत सवणे,**
> **मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# दीडनंतरही डीजे..पोलिसांची पबवर कारवाई

## विनापरवाना साउंड सिस्टीम वाजवत पब उघडे : दोन पबला दणका

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील पब, बार, रूफ टॉप हॉटेल आणि रेस्टॉरंट यांना रात्री दीडपर्यंतची वेळ ठरवून दिलेली असताना, पुणे पोलिसांचे आदेश धुडकावून विनापरवाना साउंड सिस्टीम वाजवत पब उघडे ठेवण्यात येत आहेत. अशाच एलरो आणि युनिकॉर्न या दोन पबला गुन्हे शाखेने दणका दिला आहे.

कल्याणीनगरमधील या दोन्ही पबवर कारवाई करत तब्बल २९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात साऊंड सिस्टिम, तंबाखूजन्य हुक्का फ्लेवर, हुक्का पॉट आदी साहित्यांचा समावेश आहे. हे दोन्ही पब पोलिसांनी सीलबंद केले आहेत.

याप्रकरणी येरवडा पोलिसांत दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. संदीप हर्षवर्धन सहस्रबुद्धे (रा. शिवाजीनगर), अमन इदा शेख (३०, रा. विकासनगर, लोहगाव), रश्मी संदेश कुमार (रा. औंध), सुमित चौधरी (रा. लोहगाव) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस नाईक अमेय रसाळ यांनी तक्रार दिली आहे.

ही कारवाई अपर पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, गुन्हे शाखेचे उपायुक्त अमोल झेंडे, सहायक आयुक्त सतीश गोवेकर, सुनील तांबे, वरिष्ठ निरीक्षक भरत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक अनिकेत पोटे व सहायक पोलीस निरीक्षक राजेश माळेगावे यांच्या पथकाने केली.

कल्याणीनगर येथील सेरेब्रह्म आयटी पार्क बी ३ या बिल्डिंगच्या आठव्या मजल्यावर एलरो नावाचे रूफ टॉप हॉटेल व पब आहे. ८ एप्रिल रोजी रात्री दीड ते सकाळी पावणेसहा वाजण्याच्या दरम्यान हा पब सुरू असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार पोलिसांनी तेथे छापा मारला. नेमून दिलेल्या वेळेपेक्षा अधिक वेळ ही आस्थापना चालून ठेवून मोठमोठ्याने साऊंड सिस्टिम वाजवण्यात येत असल्याचे समोर आले.

येथून सतरा लाख रुपयांची साउंड सिस्टिम, साऊंड बॉक्स, कन्सोल, लाईट कंट्रोलर. यासोबतच ३ लाख ८७ हजार ८४१ रुपयांचे तंबाखूजन्य हक्क फ्लेवर, हुक्का पॉट आदी साहित्य मिळून वीस लाख ८७ हजार ८४१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, तर पोलीस शिपाई संदीप कोळगे यांच्या तक्रारीवरून संदीप हर्षवर्धन सहस्रबुद्धे, प्रफुल्ल बाळासाहेब गोरे (३०, रा. सह्याद्री हॉस्पिटल जवळ, येरवडा), रश्मी संदेश कुमार, सुमित चौधरी यांच्यधात दुसरा गुन्हा नोंद केला आहे. सेरेब्रह्म आयटी पार्क कल्याणीनगर या बिल्डिंगच्या आठव्या मजल्यावरच हॉटेल युनिकॉन हाउस नावाचा आणखी एक पब या सर्वांनी चालवला होता. तेथे रात्री दीड ते पहाटे पावणे सहापर्यंत बेकायदेशीरपणे पब सुरू होता. येथून ७ लाख ९१ हजार १४९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. परिमंडळ चारच्या हद्दीत नियमांचे उल्लंघन होताना दिसत आहे.



### पोलीस ठाण्यांचे अभय ...

» पोलीस आयुक्तांच्या आदेशाची पोलीस ठाण्यांनी कडक अंमलबजावणी केली. मात्र, ती फक्त काही आठवडेच. नंतर मात्र चोरी छुपे आणि स्वत:च्या अधिकारात त्यांना अभय देण्याचे प्रकार घडत आहेत. यामध्ये परिमंडळ चारच्या हद्दीत सर्वाधिक नियमांचे उल्लंघन होताना दिसत आहे.चतुर्श्रृंगी, येरवडा, विमानतळ, चंदननगर ही पोलीस ठाणी परिमंडळ चारमध्ये महत्त्वाची मानली जातात. इतर पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील चोरी छुपे धंदे बघून काही पोलीस ठाण्यांचे प्रभारी मग आमच्यावर का अन्याय? असे खुलेआम बोलत आहेत.

# राज ठाकरेंचं महायुतीला समर्थन जाहीर

## पुण्यात मनसेच्या मतांचं विभाजन : धंगेकर-मोरे मतं खाण्याची शहरात चर्चा रंगली



**पुणे | प्रतिनिधी**

राज ठाकरे यांनी शिवतीर्थावरून गुढीपाडवा मेळाव्यात 'महायुती'ला पाठिंबा जाहीर केल्यानंतर त्याचे पडसाद पुण्यात उमटले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) प्रमुख राज ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीत 'महायुती'ला पाठिंबा जाहीर केल्याने पुणे शहरातील 'मनसे'च्या सरासरी असलेल्या दहा टक्के मतांवर त्याचा कसा परिणाम होणार, याची शहरात चर्चा रंगली आहे. गेल्या महापालिका निवडणुकीत 'मनसे'ला पावणेचार लाख, तर विधानसभेला एक लाख मते मिळाली होती. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजपविरोधात असलेले दोन्हीही उमेदवार हे 'पूर्वाश्रमी'चे 'मनसे'चे असल्याने 'मनसे'ची मते तीन ठिकाणी विभागली जातील, अशी शक्यता यानिमित्ताने व्यक्त होत आहे.

ठाकरे यांनी शिवतीर्थावरून 'महायुती'ला पाठिंबा जाहीर केल्यानंतर त्याचे पडसाद पुण्यात उमटले. पुणे शहरात मनसेला गेल्या निवडणुकांमध्ये सरासरी दहा टक्के मिळाली आहेत. विधानसभा; तसेच लोकसभेला सुमारे एक लाख मते मिळाली आहेत. याशिवाय २०१२ आणि २०१७ च्या महापालिका निवडणुकीत अनुक्रमे पाच आणि तीन लाख मते मिळाली आहेत. पुणे शहराशी संबंधित असलेल्या शिरूर, हडपसर आणि पुणे लोकसभा मतदारसंघांत त्याचा फायदा होण्याचा दावा महायुतीच्या नेत्यांकडून करण्यात येत आहे.

लोकसभा निवडणूक आणि मनसेची मते २००९ : ७५ हजार ८८७ ,२०१४ : ९३ हजार ४४९

महापालिका निवडणूक आणि मनसेची मते २०१२ : पाच लाख १९ हजार ४३७ मते (२९ नगरसेवक) २०१७ : तीन लाख ७३ हजार ६४५ मते (दोन नगरसेवक)

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी लोकसभेच्या निवडणुकीत महायुतीला पाठींबा देण्याचा निर्णय घेताच मनसेमध्ये गळतीला सुरूवात झाली आहे. ठाकरे यांनी शिवतीर्थ येथ झालेल्या गुढीपाडवा मेळाव्यात भारतीय जनता पक्षाला मंगळवारी बिनशर्त पाठींबा देण्याचा निर्णय घेतला. ठाकरे यांनी घेतलेल्या निर्णयामुळे मनसेच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली आहे. हा निर्णय होऊन काही तास होत नाही तोच मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी मनसेला सोडचिठ्ठी देण्यास सुरूवात केली आहे.

मनसेचे जुने पदाधिकारी आणि सरचिटणीस असलेल्या कीर्तीकुमार शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत पक्षाला रामराम केला आहे. राज ठाकरे यांनी आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपला बिनशर्त पाठींबा देत लोकसभा निवडणूक न लढविण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानंतर नाराज झालेल्या मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी राजीनामा देण्यास सुरूवात केली आहे

### 2009, 2014 ची लोकसभा आणि मनसे

» सन २००४ च्या पुणे लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार सुरेश कलमाडी आणि भाजपचे उमेदवार प्रदीप रावत यांना अनुक्रमे ४९ आणि ३९ टक्के मते मिळाली होती. या दोघांमध्ये दहा टक्के मतांचा फरक होता. मात्र, २००९च्या लोकसभा निवडणुकीत कलमाडी यांनी पुन्हा विजय मिळवला असला तरी त्यांच्या विजयामध्ये केवळ साडेतीन टक्के मतांचा फरक होता. तर, या निवडणुकीत मनसेला सुमारे दहा टक्के मते मिळाली होती. या सार्वत्रिक निवडणुकीत पुण्यातून मनसेचे उमेदवार दीपक पायगुडे यांना ९४ हजार मते मिळाली होती. या निवडणुकीत भाजपचे उमेदवार अनिल शिरोळे हे तीन लाख मतांहून अधिक मताधिक्याने निवडून आले असले तरी मनसेची मते कायम राहिली होती. सलग दोन निवडणुकांमध्ये मनसेच्या मतांच्या टक्केवारीत फरक पडलेला नव्हता.

> महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी 'महायुती'ला दिलेला बिनशर्त पाठिंबा, हा त्यांच्या देशाच्या विकासाबद्दल असलेला सच्चेपणा अधोरेखित करतो. हिंदू नववर्षाच्या शुभदिनी केलेल्या या घोषणेमुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांना निश्चितच बळ मिळाले आहे. पुणे लोकसभा निडणुकीतही मनसैनिकांना सोबत घेऊन आम्ही एकदिलाने सामोरे जावू आणि मोठ्या मताधिक्याने जिंकू.
>
> - मुरलीधर मोहोळ, उमेदवार, भाजप

# रमजान ईद निमित्त चिंचवडमधील वाहतुकीत बदल

## ईदगाह मैदानाकडे जाणारी व येणारी वाहतूक पर्यायी रस्त्याने वळविण्यात आली

**पुणे | प्रतिनिधी**

रमजान ईद निमित्त चापेकर चौक, चिंचवडगाव येथील ईदगाह मैदान येथे नमाज पठण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरीक येत असतात. त्यामुळे गुरूवारी (दि. 11) पहाटे पाच ते दुपारी बारा या कालावधीत ईदगाह मैदानाकडे जाणारी व येणारी वाहतूक पर्यायी रस्त्याने वळविण्यात आली आहे. याबाबत वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी आदेश दिले आहेत.

रमजान ईद निमित्ताने गोळीबार मैदान येथील ईदगाह मैदानावर होणाऱ्या नमाज पठणाच्या पार्श्वभूमीवर परिसरातील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. हा बदल मंगळवारी सकाळी सहा वाजतापासून नमाज पठण पूर्ण होईपर्यंत असणार आहे, अशी माहिती वाहतूक उपायुक्त राहुल श्रीरामे यांनी दिली आहे. यावेळी नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे. गोळीबार मैदान चौकातून स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी चौकातून डाव्या बाजूने वळून सीटीओ चौक- सॅलिसबरी पार्क-गिरीधर भवन चौक- ढोले चौक (सेव्हन लव्हज चौक) मार्गाने पुढे जावे. भैरोबानाला येथे गोळीबार मैदानाकडे जाणारी वाहतूक बंद करून एम्प्रेस गार्डन आणि लुल्लानगरकडे वळविण्यात येणार आहे.



**वाहतूक वळवलेले मार्ग –** मरीआई माता मंदिर ते चापेकर चौक जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे.पर्यायी मार्ग – या मार्गावरील वाहतूक एस के एफ कंपनीकडून डाव्या बाजूला वळून अहिंसा चौक मार्गे इच्छित स्थळी जाईल. चापेकर चौक ते मरीआई माता मंदिर जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –**

या मार्गावरील वाहतूक चापेकर चौक जुना जकात नाका कडून उजव्या बाजूला वळून सेव्हन ऑरेंज हॉस्पीटल मार्गे इच्छित स्थळी जाईल. अथवा चापेकर चौकातून उजव्या बाजूला वळून अंहिसा चौक मार्गे इच्छित स्थळी जाईल. बिजलीनगर, हनुमान मंदिर वेताळ नगर ते चापेकर चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे.पर्यायी मार्ग – या मार्गावरील वाहतूक हनुमान मंदिर येथून डावीकडे वळून मरीआई माता मंदिर किंवा सेव्हन ऑरेंज हॉस्पीटल कडून इच्छित स्थळी जाईल.